आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
४ ऑगस्ट २०२५ - सोमवार

- **<u>ठळक बातम्या</u>**
- माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचं निधन
- राष्ट्रपती, प्रधानमंत्री आणि इतर मान्यवरांची सोरेन यांना आदरांजली
- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक मुंबईत सुरू
- महिलांच्या जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय संघात वैष्णवी पाटीलची निवड

**आणि**

- अँडरसन - तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या सामन्यात इंग्लंड विजयाच्या उंबरठ्यावर

**<><><><>**

माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचं आज नवी दिल्लीच्या सर गंगाराम रुग्णालयात निधन झालं, ते ८१ वर्षांचे होते. गेल्या अनेक दिवसांपासून ते मूत्रपिंडविकारावर उपचार घेत होते. दीड महिन्यापूर्वी त्यांची प्रकृती अधिक बिघडली होती.

शिबू सोरेन हे झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक सदस्य होते. दुमका मतदारसंघातून ते तीन वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. तर दोन वेळा राज्यसभेचे सदस्य होते.

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या पहिल्या कार्यकाळात ते कोळसा मंत्री होते. संथाल जमातीतले सोरेन यांनी आदिवासींच्या हक्कांसाठी दीर्घ लढा दिला होता. झारखंडचं मुख्यमंत्रीपद त्यांनी तीन वेळा भूषवलं.

झारखंडचे विद्यमान मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे ते वडील होते. शिबू सोरेन यांच्या निधनाबद्दल झारखंडमधे तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाला असून झारखंड विधानसभेचं अधिवेशन अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं आहे. त्यांचं पार्थिव आज रांचीला नेण्यात येणार आहे.

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इतर मान्यवरांनी सर गंगाराम रुग्णालयात जाऊन शिबू सोरेन यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं, तसंच हेमंत सोरेन यांचं सांत्वन केलं.

सोरेन यांचं निधन हे सामाजिक न्यायाच्या क्षेत्राचं मोठं नुकसान आहे. सोरेन यांनी आदिवासींना ओळख मिळावी म्हणून आणि झारखंड राज्याच्या निर्मितीसाठी पुढाकार घेतल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. तर, सोरेन हे आदिवासी समुदाय, गोरगरीब आणि दलितांचं सक्षमीकरण करणारे नेते होते, अशा शोकभावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केल्या आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही सोरेन यांना आदरांजली वाहिली आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शिबू यांचे पुत्र हेमंत सोरेन यांना पत्र लिहून शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सोरेन यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. सोरेन यांच्या निधनामुळे झारखंडने एक पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आणि एक कुशल संसदपटू गमावल्याची भावना राज्यपालांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे.

**<><><>**

राज्यसभेचं कामकाज आज सकाळी सुरु झाल्यावर दिवंगत नेते शिबू सोरेन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली, आणि त्यानंतर सदनाचं कामकाज उद्या सकाळपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेतही दिवंगत नेते शिबू सोरेन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

**<><><>**

विविध मुद्द्यांवर विरोधी पक्ष सदस्यांच्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज आधी दुपारी २ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

रोजगार मेळ्यात मागच्या १६ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख जणांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी आज लोकसभेत, एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या एका अहवालानुसार गेल्या दशकात १७ कोटीहून अधिक युवकांना रोजगार मिळाला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजने

अंतर्गत येत्या ५ वर्षात ४ कोटीहून अधिक रोजगार संधी निर्माण करण्यासाठी सरकारनं २ लाख कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, असंही त्यांनी सांगितलं.

देशातल्या बेरोजगारांचं प्रमाण ३ पूर्णांक २ दशांश इतकं खाली घसरलं असून ते अनेक विकसित राष्ट्रांच्या तुलनेत कमी आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी २०२० मधे गलवान व्हॅली इथं चीनसोबत झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीय लष्कराबाबत केलेल्या कथित अपमानास्पद वक्तव्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं नाराजी व्यक्त केली आहे. विरोधी पक्षनेते म्हणून गांधी यांनी असे मुद्दे समाजमाध्यमांवर न मांडता लोकसभेत मांडावेत, असं न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि ए जी मसीह यांच्या पीठाने सांगितलं. चीनने भारताचा दोन हजार किलोमीटर भूभाग ताब्यात घेतल्याच्या गांधी यांच्या दाव्यावरही न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं.

<><><><>

बिहारमधे मतदारयाद्यांच्या पुनरिक्षणात ६५ लाख ६४ हजार व्यक्तींची नावं हटवण्याचा आल्याचा आरोप काँग्रेसनं आज वार्ताहर परिषदेत केला. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या गैरप्रकारांबद्दल केंद्रीय निवडणूक आयोगाला लिहिलेल्या पत्रांना प्रतिसाद मिळाला नाही असं बिहारचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष राजेश कुमार यांनी सांगितलं. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर यादीतून वगळण्यात आलेल्या लोकांची नावं नाहीत. शिवाय त्यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनातही त्याचा उल्लेख नाही, असं ते म्हणाले.

<><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक आजपासून सुरू झाली. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखालील ही समिती येत्या बुधवारी पतधोरणाचा द्वैमासिक आढावा जाहीर करेल. आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर पत पुरवठ्याला चालना देण्यासाठी रेपो दरात पाव टक्के कपात होण्याची शक्यता भारतीय स्टेट बँकेनं वर्तवली आहे. मात्र सलग तीन वेळा व्याज दर कमी केल्यामुळे आता रिझर्व्ह बँक व्याज दरात बदल करणार नाही, असं मत काही अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

<><><><>

जम्मू काश्मीरमध्ये लष्कर, सुरक्षा दल आणि जम्मू काश्मीर पोलीसांनी राबवलेल्या ऑपरेशन महादेव मध्ये मारले गेलेले तीन दहशतवादी पाकिस्तानी असल्याचं न्याय वैद्यक पुराव्यानं स्पष्ट झालं आहे. या तिघांच्या मृतदेहाचे फॉरेन्सिक अहवाल आणि इतर माहितीवरुन ही बाब समोर आली. हे तीन दहशतवादी लष्कर - ए - तय्यबा या संघटनेचे सदस्य होते. पहलगाम इथं हल्ला केल्यानंतर ते चिगाम हरवन जंगलात लपून बसले होते, असं तपासातून निष्पन्न झालं आहे.

दरम्यान, जम्मू काश्मीरमधल्या कुलगाम जिल्ह्यातल्या अखल देवसर भागात आज सलग चौथ्या दिवशीही सुरक्षा दलांची शोध मोहीम सुरु आहे. भारतीय लष्कर , जम्मू काश्मीर पोलीस, सीआरपीएफ आणि विशेष मोहीम दलाचे जवान या मोहिमेत सहभागी झाले आहेत.

**<><><><>**

महिलांच्या जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी नवी दिल्ली इथे झालेल्या पात्रता सामन्यांमध्ये महाराष्ट्राच्या वैष्णवी पाटील ने ६५ किलो वजनी गटात आपलं स्थान निश्चित केलं आहे. ५३ किलो वजनी गटात अंतिम पंघाल, ६२ किलो वजनी गटात मनिषा भानवाला, ७२ किलो वजनी गटात ज्योती तर ७६ किलो वजनी गटात प्रिया मलिक भारताचं प्रतिनिधित्व करतील.

**<><><><>**

लंडनच्या केनिंगटन ओव्हल मैदानावर सुरू असलेल्या अँडरसन तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या आणि अंतिम सामन्यात काल चौथ्या दिवशी अपुऱ्या उजेडामुळं खेळ थांबवण्यात आला तेव्हा इंग्लंडच्या दुसऱ्या डावात सहा गडी बाद ३३९ धावा झाल्या होत्या. ज्यो रूटनं १०५ आणि हॅरी ब्रुकनं १११ धावा केल्या. आज पाचव्या दिवशी सामना जिंकण्यासाठी इंग्लंडला ३५ धावांची तर भारताला विजयासाठी चार बळींची आवश्यकता आहे.

**<><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरीजवळ हातखंबा गावात आज सकाळी एलपीजी वाहून नेणाऱ्या टँकरचा अपघात झाला. चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे रस्त्यावरून खाली येऊन हा टँकर शाळेजवळच्या एका टपरीत घुसला आणि त्याने दोन-तीन दुचाकींना धडक

दिली. टँकरचा चालक जखमी झाला आहे. अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी काही काळ मुंबई-गोवा महामार्गावरची वाहतूक रोखून धरली होती. महामार्ग चौपदरीकरणाचं काम सुरू असून, त्या संदर्भातलं नियोजन चुकल्यामुळे अपघात होत असल्याचं, तसंच ज्वलनशील पदार्थांची वाहतूक करणाऱ्या टँकरचे या भागात वारंवार अपघात होत असल्यामुळे परिसरातल्या नागरिकांच्या जीविताला धोका असल्याचं ग्रामस्थांचं म्हणणं आहे. पोलिसांसह नेते, सामाजिक कार्यकर्त्यांनी नागरिकांशी संवाद साधल्यानंतर रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आलं. या समस्येवर उपाययोजनेसाठी पोलीस अधीक्षक कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली आहे.

त्या व्यतिरिक्त आज सकाळी हातखंब्याजवळच्या निवळी गावातही एक एलपीजी टँकर उलटून अपघात झाला आहे.

<><><><>

छत्रपती संभाजीनगर इथल्या कौटुंबिक न्यायालयात जवळपास ३२ वर्षांनंतर वकील संघाची स्थापना करण्यात आली आहे. जिल्ह्यात १९९३ मध्ये कौटुंबिक न्यायालयाची सुरुवात झाली होती. धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून नुकतंच यासंबंधीचं नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालं असून त्यानुसार, संस्थापक कार्यकारिणी निश्चित केल्याची माहिती वकील संघाच्या सूत्रांनी दिली.

//<><><><>//